मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहिराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# भाजपा शहराध्यक्ष शंकर जगतापांच्या प्रयत्नातून चिंचवडमध्ये विकासकामांचा धडाका

## चिंचवड मतदारसंघात ४५० ते ५०० कोटी रूपयांच्या रस्त्यांचा होतोय विकास

**पिंपरी-चिंचवड**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी।**

पिंपरी-चिंचवड भाजपचे शहराध्यक्ष शंकर जगताप यांनी चिंचवड विधानसभा मतदारसंघात पायाभूत सुविधा पोहोचवण्यासाठी पुढाकार घेत महापालिका प्रशासनाकडे पाठपुरावा सुरू केला आहे. त्यानुसार वाकड, पुनावळे, ताथवडे, मामुर्डी, रावेत आणि विकासनगर या भागातील ४५० ते ५०० कोटी खर्चाचे सुमारे ३४ किलोमीटर लांबीचे रस्ते करण्यात येणार आहेत. हे सर्व रस्ते महापालिकेच्या विकास आराखड्यातील (डीपी) आहेत. या रस्त्यांच्या कामांना लवकरच सुरूवात होणार आहे. त्यामुळे पीएमआरडी हद्दीतील मावळचा ग्रामीण भाग आणि हिंजवडी आयटी पार्कसोबत पिंपरी-चिंचवडची कनेक्टिव्हीटी आणखी वाढणार आहे. रस्ते नसल्यामुळे नागरिकांना येणाऱ्या अडचणी त्यांनी जाणून घेतल्या. या भागात अनेक गृहप्रकल्प उभे आहेत. तसेच अनेक गृहप्रकल्पांची कामे सुरू आहेत. अनेक नामांकित शैक्षणिक संस्थांनी या भागात शाळा-महाविद्यालये सुरू केली आहेत. जवळच हिंजवडी आयटी पार्क आहे. त्याचप्रमाणे मुंबईला जाण्यासाठी द्रुतगती महामार्गाही उपलब्ध आहे. त्यामुळे या भागात वास्तव्याला येणाऱ्यांची संख्या कित्येक पटीने वाढली आहे. परिणामी विकास आराखड्यातील





रस्ते झालेले नसल्याने या भागातील नागरिकांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. या सर्व बाबी पाहिल्यानंतर शंकर जगताप यांनी पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या विकास आराखड्यातील चिंचवड विधानसभा मतदारसंघातील रस्ते विकसित व्हावेत यासाठी महापालिका प्रशासनाकडे पाठपुरावा केला. विकासनगर या भागातील ४५० ते ५०० कोटी खर्चाच्या सुमारे ३४ किलोमीटर लांबीच्या रस्त्यांना महापालिका आयुक्तांनी मंजुरी दिली आहे. त्यामध्ये मुंबई-बंगळुरू महामार्गाला लागून असलेल्या सर्व्हिस रस्त्यांचाही समावेश आहे. त्याचप्रमाणे मामुर्डी स्मशानभूमीजवळ पवना नदीवर सांगवडे व हिंजवडीला जोडणारा पूल, रावेत व किवळे भागात समीर लॉन्समागील नदीजवळील १८ मीटरचा रस्ता, विकासनगरमधील मुख्य रस्ता, पुनावळे अंडरपास ते काटेवस्ती ३० मीटरचा रस्ता, कोयतेवस्ती चौक ते जांभेकडे जाणारा १८ मीटरचा रस्ता, वाकड मधूबन हॉटेल ते इंदिरा रोड ते सिल्व्हर स्कूल हॉटेल २४ व १८ मीटरचा रस्ता तसेच त्या त्या भागातील विकास आराखड्यातील इतर रस्त्यांचा समावेश आहे. त्यामुळे या भागात रस्ते विकासकामांचा लवकरच धडाका सुरू होणार आहे. हे रस्ते करताना ते वारंवार खोदावे लागणार नाहीत अशा पद्धतीने केले जाणार आहेत. पाणीपुरवठ्याची पाईपलाईन, ड्रेनेजलाईन, विद्युतलाईन टाकूनच हे रस्ते कायमस्वरूपी विकसित केले जाणार आहेत. याबाबत अधिक माहिती देताना भाजपचे शहराध्यक्ष शंकर जगताप म्हणाले, पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या विकास आराखड्यात असलेली चिंचवड विधानसभा मतदारसंघातील अनेक रस्ते मार्गी लावण्याचा आमचा प्रयत्न आहे. त्यासाठी आधी हे रस्ते कोणते याची माहिती गोळा करून ते पूर्ण करण्यासाठी महापालिका प्रशासनाकडे गेल्या तीन महिन्यांपासून सातत्याने पाठपुरावा करण्यात आला. अखेर प्रशासनाने त्यावर कार्यवाही करून पहिल्या टप्प्यात वाकड, पुनावळे, ताथवडे, मामुर्डी, रावेत आणि विकासनगर या भागातील ४५० ते ५०० कोटींच्या खर्चाचे रस्ते मंजूर केले आहेत.

# बारणे-शेळके यांच्यात मावळ जागेवरून कलगीतुरा

## मावळ लोकसभेची जागा राष्ट्रवादी पवार गटाला मिळाली पाहिजे : सुनील शेळके

**पिंपरी-चिंचवड**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी।**

आगामी लोकसभा निवडणुकीत मावळ मतदारसंघातून महायुतीचे उमेदवार म्हणून विद्यमान खासदार श्रीरंग बारणे यांनी उमेदवारी अगोदरच जाहीर केली आहे. त्यानंतर ही जागा राष्ट्रवादी काँग्रेसला (अजित पवार) मिळावी आमदार सुनील शेळके यांनी दावा ठोकला. यामुळे ही जागा महायुतीत शिवसेना लढणार की राष्ट्रवादी अजित पवार गट लढणार अशी संभ्रमावस्था निर्माण झाली आहे. महायुतीतच मावळच्या जागेसाठी बारणे विरुद्ध शेळके यांच्यात कलगीतुरा रंगू लागला आहे. मावळ लोकसभेची जागा राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाला मिळाली पाहिजे, याचा पुनरुच्चार सुनील शेळके यांनी शनिवारी पुन्हा केला.




राज्य विधीमंडळाच्या हिवाळी अधिवेशनात मावळसाठी आणलेल्या निधीची माहिती शेळके यांनी दिली. मात्र, केवळ तिसऱ्यांदा उमेदवारी मागताना केलेल्या कामाचा अहवाल बारणे यांनी द्यावा, महायुतीचा कोणीही उमेदवार असो, मग ते बारणे असले तरी पक्षाच्या आदेशानुसार काम करू, असेही शेळके यांनी सांगितले.

> मावळ लोकसभेची जागा राष्ट्रवादीलाच सोडली पाहिजे. राष्ट्रवादीला जागा का सोडावी, याचा लेखाजोखा देखील भाजप-शिवसेना व राष्ट्रवादीच्या वरिष्ठ नेत्यांना दिलेला आहे. मावळमध्ये राष्ट्रवादीला संधी दिल्यास उमेदवार सव्वा ते दीड लाखांचे मताधिक्य घेईल.
> – सुनील शेळके, आमदार

> उमेदवारी मागण्याचा अधिकार प्रत्येक पक्षाला आहे. माझ्या उमेदवारीबाबत केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याबरोबर सकारात्मक चर्चा झालेली आहे. त्यामुळे मला माझ्या उमेदवारीबाबत चिंता नाही.
> – श्रीरंग बारणे, खासदार

# सांगवी ते नारायणपूर बससेवा उत्साहात सुरू

## भाजपा शहराध्यक्ष शंकर जगताप यांच्या प्रयत्नामुळे शक्य



**पिंपरी-चिंचवड न्यूज एक्स्प्रेस मराठी।** भाजपचे सांगवी रहाटणी मंडळाचे उपाध्यक्ष ललित म्हसेकर यांच्या मागणीनुसार व भाजप शहराध्यक्ष शंकर जगताप यांच्या प्रयत्नातून पिंपळे गुरव ते सासवडमार्गे नारायणपूर बससेवा सुरू करण्यात आली आहे. ललित म्हसेकर, पिंपळे गुरव येथील महिला व ज्येष्ठ नागरिकांच्या हस्ते बससेवेचा लोकार्पण सोहळा पिंपळे गुरव येथे झाला. श्री दत्तगुरूंच्या जयघोषात व टाळ-मृदंगाच्या गजरात बसचे स्वागत करण्यात आले. या बससेवेमुळे पिंपळे गुरव, सांगवी भागातील नागरिकांना नारायणपूर येथील श्री एकमुखी दत्त महाराजांच्या दर्शनाला जाता येणार आहे. या बससेवेचा मार्ग पिंपळे गुरव, सांगवी, परिसरातून श्री क्षेत्र नारायणपूर येथे जाणाऱ्या भाविकांच्या सोईसाठी दर गुरुवार व पौर्णिमेच्या दिवशी बसमार्ग क्र. वाय १८ पिंपळे गुरव ते श्री क्षेत्र नारायणपूर (मार्गे सांगवी, दापोडी, खडकी बाजार, येरवडा, पुणे स्टेशन, हडपसर, सासवड) असा बसमार्ग प्रायोगिक तत्वावर सुरू करण्यात येत असून, त्या अनुषंगाने या मार्गाचे नवीन वेळापत्रक तयार करण्यात येणार आहे.या प्रसंगी पिंपळे गुरव ते श्री क्षेत्र नारायणपूर बसचालकांचा सन्मान नारायणपूर दत्त मंदिर येथे उद्योजक विजय पांडुरंग जगताप व मित्र परिवार यांच्या हस्ते करण्यात आला.।जपचे सांगवी रहाटणी मंडळाचे उपाध्यक्ष ललित म्हसेकर यांच्या मागणीनुसार व भाजप शहराध्यक्ष शंकर जगताप यांच्या प्रयत्नातून पिंपळे गुरव ते सासवडमार्गे नारायणपूर बससेवा सुरू करण्यात आली आहे. ललित म्हसेकर, पिंपळे गुरव येथील महिला व ज्येष्ठ नागरिकांच्या हस्ते बससेवेचा लोकार्पण सोहळा पिंपळे गुरव येथे झाला. श्री दत्तगुरूंच्या जयघोषात व टाळ-मृदंगाच्या गजरात बसचे स्वागत करण्यात आले. या बससेवेमुळे पिंपळे गुरव, सांगवी भागातील नागरिकांना नारायणपूर येथील श्री एकमुखी दत्त महाराजांच्या दर्शनाला जाता येणार आहे. या बससेवेचा मार्ग पिंपळे गुरव, सांगवी, परिसरातून श्री क्षेत्र नारायणपूर येथे जाणाऱ्या भाविकांच्या सोईसाठी दर गुरुवार व पौर्णिमेच्या दिवशी बसमार्ग क्र. वाय १८ पिंपळे गुरव ते श्री क्षेत्र नारायणपूर (मार्गे सांगवी, दापोडी, खडकी बाजार, येरवडा, पुणे स्टेशन, हडपसर, सासवड) असा बसमार्ग प्रायोगिक तत्वावर सुरू करण्यात येत असून, त्या अनुषंगाने या मार्गाचे नवीन वेळापत्रक तयार करण्यात येणार आहे.या प्रसंगी पिंपळे गुरव ते श्री क्षेत्र नारायणपूर बसचालकांचा सन्मान नारायणपूर दत्त मंदिर येथे उद्योजक विजय पांडुरंग जगताप व मित्र परिवार यांच्या हस्ते करण्यात आला.

# मोशी, निगडी येथे सांडले ऑईल

## ऑईलची टाकी लिक झाल्याने हे ऑईल सांडले



**पिंपरी-चिंचवड न्यूज एक्स्प्रेस मराठी।** ऑईल सांडल्याच्या रविवारी (दि. ४) दोनघटना घडल्या. पहिली घटना मोशी येथे येथे घडली. तर दुसरी घटना निगडी येथे घडली. मोशी परिसरातील अलंकापुरम चौक ते वडमुखवाडीया दरम्यान एका डंपरमधील ऑईल सांडले. डंपरमधील ऑईलची टाकी लिक झाल्याने हे ऑईल सांडले. सुमारे दोन ते अडीच किलोमीटर गेल्यानंतर डंपर चालकाच्या ही बाब निदर्शनास आली. त्यानंतर डंपर बाजूला थांबवण्यात आला मोशी उपअग्निशमन केंद्राच्या जवानांनी ऑईल सांडलेल्या ठिकाणी माती टाकून रस्ता वाहतुकीसाठी सुरक्षित केला. ऑईल सांडल्याची दुसरी घटना निगडी प्राधिकरण येथील भेळ चौकात घडली. प्राधिकरण उपअग्निशमन केंद्राच्या जवानांनी घटनास्थळी धाव घेतली. जवानांनी ऑईल सांडलेला रस्ता धुवून ऑईल काढले.

# देहूत गुरुवारपासून


## कीर्तन सोहळ्याचे आयोजन

**पिंपरी-चिंचवड न्यूज एक्स्प्रेस मराठी।** संत तुकाराम महाराज संस्थान आणि संत तुकाराम महाराज जन्मोत्सव सोहळा समितीच्या वतीने गुरुवार (ता. ८) ते बुधवार (ता. १४) कीर्तन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. संत तुकाराम महाराज जन्मोत्सव १४ फेब्रुवारी म्हणजे वसंत पंचमीला असल्याने कीर्तन सोहळ्याचे आयोजन केले आहे. वैकुंठ स्थान येथे रात्री सात ते नऊ या वेळेत कीर्तन होणार आहे. गुरुवारी (ता. ८) विकासानंद मिसाळ यांचे कीर्तन होईल. शुक्रवारी (ता. ९) महादेव महाराज राऊत, शनिवारी (ता. १०) प्रमोद महाराज जगताप, रविवारी (ता. ११) पंकज महाराज गावडे, सोमवारी (ता. १२) नीलेश महाराज झरेगावकर, मंगळवारी (ता. १३) संजय महाराज घोडगे यांचे कीर्तन होईल.

# तुम्हाला भावनिक बनवण्याचा प्रयत्न

## शरद पवार यांच्यावर अत्यंत कठोर शब्दांमध्ये टीका

**पिंपरी-चिंचवड**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी।** राष्ट्रवादी काँग्रेसला खिंडार पाडून भाजपच्या मांडीला मांडी लावून बसल्यानंतर अजित पवार यांनी आता बारामती लोकसभेसाठी थेट रणशिंग फुंकलं आहे. आज (४ फेब्रुवारी) बारामती दौऱ्यामध्ये अजित पवार यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांच्यावर अत्यंत कठोर शब्दांमध्ये टीका करतानाच बारामतीसाठी मीच उभा आहे असं समजून मी देणाऱ्या उमेदवाराला मतदान करा, असं आवाहन केले. त्यांनी या माध्यमातून बारामती लोकसभा निवडणूक लढवण्याचे स्पष्ट केले. बारामतीमधून सुप्रिया सुळे या खासदार आहेत. त्यामुळे त्यांच्या विरोधात आता अजित पवार यांच्या घरामधील उमेदवार असणार की अन्य कोणाचे नाव समोर येणार





याबाबत अजून स्पष्टता नसली, तरी अजित पवार गटाकडून बारामतीमधून त्यांच्या पत्नी सुनेत्रा पवार लोकसभा निवडणूक लढवण्यावर शिक्कामोर्तब होण्याची शक्यता आहे. बारामती लोकसभेसाठी सुनिता पवार यांचे नाव चर्चेत आहे. तसं झाल्यास बारामती लोकसभेला नणंद विरुद्ध भावजय असा घरातून संघर्ष होण्याची दाट शक्यता आहे. बारामतीमध्ये बोलताना अजित पवार यांनी शरद पवार यांच्यावर घणाघाती टीका केली. ते म्हणाले की, आज वातावरण मोदींना संधी द्यावी या पद्धतीनेच आहे. शेती, घरकुल अशा खूप योजना त्यांनी आणल्या आहेत. भारताचे नाव जगामध्ये उंचावले आहे. बारामतीमध्ये कामे मी सरकारमध्ये असल्याने ती कामे होत आहेत. आपल्या विचाराचा खासदार झाल्यास आपली कामं झाली पाहिजेत हे मला सांगता येईल. त्यांनी नुसतं एस म्हटल्यास मोठा निधी मिळतो. आपला खासदार झाल्यावर आपलं रेल्वे स्टेशन कसे करतो बघा असं आश्वासने त्यांनी दिले. आपल्या विचाराचा खासदार असल्यानंतर फरक पडे. तुम्हाला भावनिक बनवण्याचा प्रयत्न केला जाईल. तिकडे अजितला द्या, आता इकडे या असं म्हटलं जाईल. अजितचे म्हणणे असे आहे की, तिकडे आणि इकडेही अजितला द्या. जर मीठाचा खडा टाकला, तर मी आमदारकीच्या बाबतीत पण विचार करेल असा इशाराही त्यांनी यावेळी दिला. त्यामुळे काय करायचं ते तुम्ही ठरवा. दरम्यान यावेळी आपण घेतलेली भूमिका कशी योग्य हे सुद्धा त्यांनी पटवून देण्याचा पुरेपूर प्रयत्न केला. ते म्हणाले की मी राजकीय भूमिका घेतली आहे. मी पाचव्यांदा उपमुख्यमंत्री झाल्यावर बारामतीमध्ये माझे अशा पद्धतीने स्वागत करतील, असे वाटले नव्हते. अनेक मिरवणूक बघितल्या, वरिष्ठांच्या बघितल्या पण असं स्वागत कधी झालं नव्हतं. एकनाथ शिंदे यांनी भूमिका घेतल्यानंतर नको नको ते शब्द वापरण्यात आले. मात्र, आपण भूमिका घेतल्यानंतर एक शब्द कोणी बोललं नाही असाही दावा अजित पवार यांनी बारामतीमध्ये बोलताना केला. सगळेच भूमिका घेणार होते, हवं तर खासगीत विचारा, असा सुद्धा दावा अजित पवार यांनी केला. आम्ही एनडीएच्या आघाडीत आहोत. आपण सगळ्यांचे नेतृत्व बघून सुरुवातीच्या काळात आम्ही मोदींवर टीका केली. मात्र, विचारधारा सोडली नाही.

### शरद पवार यांच्यावर टीका

» फुले, शाहू, आंबेडकर यांचा विचार घेऊन पुढे चाललो आहोत. छगन भुजबळ, हसन मुश्रीफ या सगळ्यांनी भूमिका घेतल्याचे ते यावेळी म्हणाले.त्यांनी या माध्यमातून बारामती लोकसभा निवडणूक लढवण्याचे स्पष्ट केले. बारामतीमधून सुप्रिया सुळे या खासदार आहेत. त्यामुळे त्यांच्या विरोधात आता अजित पवार यांच्या घरामधील उमेदवार असणार की अन्य कोणाचे नाव समोर येणार याबाबत अजून स्पष्टता नसली, तरी अजित पवार गटाकडून बारामतीमधून त्यांच्या पत्नी सुनेत्रा पवार लोकसभा निवडणूक लढवण्यावर शिक्कामोर्तब होण्याची शक्यता आहे.

# ज्ञानोबा-तुकोबांचे विचार देशभरात पोहचेल!

## गीताभक्ती अमृत महोत्सवात गोविंददेव महाराज यांचे प्रतिपादन

**पिंपरी-चिंचवड**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी।** वाढदिवस हे केवळ निमित्त आहे, या निमित्ताने ज्ञानोबा-तुकारामांच्या विचार देशभरात पोहोचेल. विश्व कल्याणाचा व समन्वयाचा, शांती आणि प्रेमाचा संदेश आपल्या सर्व संतानी दिला. महाराष्ट्राचे संत शिरोमणी ज्ञानदेवांच्या भूमित हा कार्यक्रम होत असल्याचा आनंद असल्याचे मत गोविंददेव गिरिजी महाराज यांनी गीताभक्ति अमृत महोत्सवात व्यक्त केले.



आपल्या जीवनातील प्रत्येक क्षण धर्मरक्षा आणि राष्ट्र निर्माणासाठी समर्पित करणारे पूज्य स्वामी श्रीगोविन्ददेव गिरिजी महाराज स्वामी विवेकानंदांसारख्या संत परंपरेचे प्रचारक आहेत. दरवर्षी पूज्य स्वामीजींचा जन्मदिवस गीताभक्ति दिवस म्हणून साजरा केला जातो. मात्र यावर्षी स्वामीजींच्या दिव्य जीवनाची ७५ वर्ष पूर्ण होत असल्याने संलग्न संस्थांनी 'गीताभक्ती अमृत महोत्सवा'चे आयोजन केले आहे. रविवारी (दि. ४) सकाळी संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊलींना अभिषेक व त्यानंतर वारकरी सत्कार, यज्ञ विधीचा शुभारंभ व कीर्तनाचे कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. गीता परिवार, महर्षी वेदव्यास प्रतिष्ठान, श्रीकृष्ण सेवानिधी व संत श्री ज्ञानेश्वर गुरुकुल या संस्थानी गीताभक्ती अमृतमहोत्सव सोहळ्याचे आयोजन करुन भारतीय संस्कृती आणि परंपरेचा अनोखा मेळ घातल्याचेही स्वामीजींनी यावेळी सांगितले. आजच्या कार्यक्रमाला वारकरी संप्रदायासह पूज्य स्वामी श्रीगोविन्ददेव गिरिजी महाराज यांना मानणारे हजारो भाविक उपस्थित होते.श्रीराम जन्मभूमी तीर्थक्षेत्र न्यासचे कोषाध्यक्ष, राष्ट्रसंत पूज्य स्वामी श्रीगोविन्ददेव गिरिजी महाराज यांच्या ७५ व्या जन्मसोहळ्यानिमित्त आळंदीनगरी सज्ज झाली आहे. रविवारी सकाळी मलुक पीठ, वृंदावनचे संत राजेंद्रदास महाराज यांचे उपस्थितीत धार्मिक अनुष्ठान करण्यात आले. यावेळी देशभरातील साधुसंतांच्या उपस्थितीने इंद्रायणीकाठी संतांचा मेळा भरल्याचीच अनुभूती मिळत होती.

# पुणेकरांच्या मिळकतकरात वाढ?

## पालिकेच्या कर आकारणी आणि कर संकलन विभागाने घेतला निर्णय

**पुणे ।**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।**
आगामी आर्थिक वर्षासाठी (२०२४-२५) मिळकतकरामध्ये वाढ न करण्याचा निर्णय महापालिकेच्या कर आकारणी आणि कर संकलन विभागाने घेतला आहे. तसा प्रस्ताव प्रशासनाकडून स्थायी समितीला देण्यात आला असून, या प्रस्तावावर स्थायी समितीच्या पुढील बैठकीत निर्णय होण्याची शक्यता आहे. महापालिका आयुक्त, प्रशासक यांच्याकडून आगामी आर्थिक वर्षासाठीचे अंदाजपत्रक तयार करण्याची प्रक्रिया सुरू झाली असून, ती अंतिम टप्प्यात आहे. महापालिका आयुक्तांना करवाढ प्रस्तावित करायची असल्यास २० फेब्रुवारीपर्यंत त्याबाबतचा प्रस्ताव ठेवावा लागतो. मात्र, यंदा प्रशासनाकडून करवाढ न करण्याचा प्रस्ताव ठेवण्यात आला आहे. त्यामुळे पुणेकरांना दिलासा सलग आठव्या वर्षी करवाढीतून दिलासा मिळणार आहे.मिळकतकर हा महापालिकेच्या उत्पन्नाचा प्रमुख आर्थिक स्त्रोत आहे. मात्र, करवाढ करण्यापेक्षा थकबाकी वसुलीला महापालिका प्रशासनाकडून प्राधान्य दिले आहे. महापालिकेचे सभागृह अस्तित्वात नाही. त्यामुळे महापालिकेचा कारभार आयुक्त यांच्याकडे प्रशासक म्हणून देण्यात आला आहे. करवाढीचा निर्णय हा धोरणात्मक असल्याने सध्या करवाढ न करण्याचे निश्चित करण्यात आले आहे. महापालिकेने मिळकतकरामध्ये यापूर्वी २०१०-११ आणि २०१६-१७ या वर्षी



अनुक्रमे १० आणि १६ एवढी वाढ केली होती. त्यानंतर प्रत्येक वर्षी मिळकतकरामध्ये ११ टक्के वाढीचा प्रस्ताव ठेवण्यात आला होता. मात्र, तो प्रत्येक वेळी स्थायी समितीने फेटाळला होता. सन २०१८ मध्ये करवाढीचा प्रस्ताव फेटाळण्यात आल्यानंतर थकबाकी वसुलीसाठी अभय योजना राबविण्यात आली होती.दरम्यान, महापालिकेने घरमालक स्वतः रहात असलेल्या मिळकतींना करामध्ये ४० टक्क्यांची सवलत दिली आहे. ही सवलत काढून घेण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला होता. त्याचे तीव्र पडसाद शहरात उमटले होते. त्यानंतर राज्याच्या मंत्रिमंडळाने सवलत कायम ठेवण्याचा निर्णय घेतला असून, त्यासंदर्भातील प्रक्रिया राबविण्यात आली आहे. आता नव्या आर्थिक वर्षात करवाढ न करण्याचा निर्णय घेत महापालिकेने मिळकतधारकांना दिलासा दिला आहे. आगामी आर्थिक वर्षासाठी (२०२४-२५) मिळकतकरामध्ये वाढ न करण्याचा निर्णय महापालिकेच्या कर आकारणी आणि कर संकलन विभागाने घेतला आहे. तसा प्रस्ताव प्रशासनाकडून स्थायी समितीला देण्यात आला असून, या प्रस्तावावर स्थायी समितीच्या पुढील बैठकीत निर्णय होण्याची शक्यता आहे. महापालिका आयुक्त, प्रशासक यांच्याकडून आगामी आर्थिक वर्षासाठीचे अंदाजपत्रक तयार करण्याची प्रक्रिया सुरू झाली असून, ती अंतिम टप्प्यात आहे. महापालिका आयुक्तांना करवाढ प्रस्तावित करायची असल्यास २० फेब्रुवारीपर्यंत त्याबाबतचा प्रस्ताव ठेवावा लागतो.

### ११ टक्के वाढीचा प्रस्ताव

**» मिळकतकर हा महापालिकेच्या उत्पन्नाचा प्रमुख आर्थिक स्त्रोत आहे. मात्र, करवाढ करण्यापेक्षा थकबाकी वसुलीला महापालिका प्रशासनाकडून प्राधान्य दिले आहे. महापालिकेचे सभागृह अस्तित्वात नाही. त्यामुळे महापालिकेचा कारभार आयुक्त यांच्याकडे प्रशासक म्हणून देण्यात आला आहे. करवाढीचा निर्णय हा धोरणात्मक असल्याने सध्या करवाढ न करण्याचे निश्चित करण्यात आले आहे. महापालिकेने मिळकतकरामध्ये यापूर्वी २०१०-११ आणि २०१६-१७ या वर्षी अनुक्रमे १० आणि १६ एवढी वाढ केली होती. त्यानंतर प्रत्येक वर्षी मिळकतकरामध्ये ११ टक्के वाढीचा प्रस्ताव ठेवण्यात आला होता.**

# तुमच्या नागरी समस्यांवर आता तुम्हीच सुचवा उपाय

## वेकअप पुणेकर' ही लोकचळवळ सोमवारपासून (५ फेब्रुवारी) सुरू

**पुणे ।**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।**
पुणेकरांना दैनंदिन जीवनात भेडसावणाऱ्या नागरी समस्या सोडविण्यासाठी 'वेकअप पुणेकर' ही लोकचळवळ सोमवारपासून (५ फेब्रुवारी) सुरू होत आहे. या अभियानात समस्यांवरील उत्तरेही पुणेकरांकडूनच जाणून घेऊन ती संबंधित विभागाकडे मांडून त्यावर उपाययोजना करण्यात येणार आहेत. याचबरोबर पुण्यातील वाहतूक कोंडी फोडण्यासाठी 'अडकलाय पुणेकर' मोहीमही राबविण्यात येणार आहे.वेकअप पुणेकर'चे




संयोजक माजी आमदार मोहन जोशी यांनी रविवारी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. यावेळी प्रवीणकुमार बिराजदार, प्रथमेश आबनावे, रोहन सुरवसे पाटील उपस्थित होते.जोशी म्हणाले की, गेल्या दहा वर्षांत पुण्याचा विस्तार झाला. लोकसंख्याही मोठ्या प्रमाणात वाढली. त्याबरोबरच वाहतूक, पाणीपुरवठा, आरोग्य, स्वच्छता, हवा प्रदूषण याबाबतचे प्रश्नही निर्माण झाले. या प्रश्नांवर उपाययोजना काय असाव्यात, याची उत्तरे पुणेकरांकडून जाणून घेण्यात येतील. त्यातून पुणेकरांमध्ये जागृती निर्माण होईल आणि जनमताचा रेटा निर्माण झाला की समस्या नेमकेपणाने सोडविणे अधिक सोपे जाईल, या उद्देशाने 'वेकअप पुणेकर' ही लोकचळवळ उभी करीत आहोत. यात स्वयंसेवी संस्था, जागरूक नागरिक, विविध विषयांचे तज्ज्ञ, सामाजिक कार्यकर्ते सहभागी असतील.पुण्यात दुचाकी, चारचाकी वाहनांची संख्या वाढत आहे. शहराच्या सर्व भागातील वाहतुकीची कोंडी होणारी ठिकाणे, सिग्नल या ठिकाणी 'अडकलाय पुणेकर' मोहीम राबविली जाईल. या मोहिमेतील स्वयंसेवक वाहनचालकांकडून प्रश्नावलीचा अर्ज भरून घेतील. या प्रश्नावलीत समस्यांवरील उत्तरेही अपेक्षित आहेत. ही मोहीम १५ दिवस राबविल्यानंतर प्रश्नावलीच्या आधारे माहिती संकलित केली जाईल आणि पुणेकरांनी सुचविलेल्या उपाययोजनांची छाननी करून ती राबविण्यासाठी 'वेकअप पुणेकर' मार्फत कसोशीने प्रयत्न करण्यात येतील.